# अलख निरंजन

## मानस शिंदे

> नाथ आणि वारकरी संप्रदायाचं मिलन ही एक अद्भुत गोष्ट आहे. गहिनीनाथांच्या शांतीसुखापासून ते ज्ञानदेवांनी मागितलेल्या विश्वशांतीच्या पसायदानापर्यंत त्याचा विस्तार झालाय. या विस्तारात चांगदेवांनीही आपलं योगदान दिलंय.

त्र्यंबकक्षेत्री आदिनाथाच्या जटेतून गोदावरी अवतरली, त्याच आदिनाथाच्या वाणीतून ज्ञानगंगा प्रगटली होती. ती ज्ञानगंगा नाथसिद्धांच्या पाऊलवाटेनं काश्मीरपर्यंत पोचली खरी; पण तिच्याच एका प्रवाहाला इंद्रायणी आणि चंद्रभागेची आस लागली होती. या ज्ञानगंगेचा इंद्रायणीत झालेला प्रवेश म्हणजेच नाथ-वारकरी संप्रदायाचं मिलन.

वारकरी संप्रदाय प्रेमाची खळखळती नदी आहे. त्यात नाथपरंपरेतून आलेली ज्ञानगंगा समाविष्ट झाली. या ज्ञानगंगेत वाहून जाण्याची चिंता नाही. कारण या नद्यांना कितीही पूर आला तरी तो जग बुडवणारा नाही तर तारणारा असेल. आणि आपण हे ध्यानी ठेवलं पाहिजे की वारकरी संप्रदायातलं दैवत, उपासना पद्धती, परंपरा स्वतंत्र असून त्यास नाथ संप्रदायाचा स्पर्श झाला आहे. जगात अनेक धर्मांचा, संप्रदायांचा एकमेकांत समावेश झाल्याचं किंवा एकावर दुसऱ्याचा प्रभाव पडल्याचं दिसतं. कधी आपोआप तर कधी काळाची गरज म्हणून तर कधी मात्र निश्चयपूर्वक असा संगम घडवला जातो. नाथ-वारकरी संप्रदायाचा संगम होण्यामागे त्या काळातली परिस्थिती कारणीभूत आहे.

नाथ हा एक शैव संप्रदाय. भगवान आदिनाथांपासून याचा उगम झाल्यानं यास 'नाथ' असं संबोधलं गेलं. मच्छिंद्रनाथ हे या संप्रदायाचे मूळ गुरू असून गोरक्षनाथांनी हा संप्रदाय वाढवला, अशी मान्यता आहे. नऊ नाथांप्रमाणं ८४ सिद्ध या संप्रदायात होऊन गेले, यांना गोरक्षनाथांनीच उपदेश केला. या संप्रदायाचा मुख्य उद्देश योगमार्गानं सिद्धअवस्था प्राप्त करून घेणं हा आहे. आठव्या शतकात संप्रदायाचा उगम झाला असावा; परंतु उगम कुठून झाला यावर मतमतांतरं आहेत. त्र्यंबकेश्वर इथल्या अनुपम शिळा इथं ८४ सिद्धांना उपदेश झाला. त्र्यंबकेश्वर इथूनच संप्रदाय उगम पावल्याचं अभ्यासकांचं मत आहे.

तत्त्वज्ञान, उपासना पद्धती, ग्रंथांच्या माध्यमातून संप्रदायानं संपूर्ण भारतभर यात्रा केली आणि 'अलख निरंजन'ची गर्जना सामान्य माणसापर्यंत पोचली. नाथ संप्रदाय नावाच्या महावृक्षानं कित्येक वर्षं, शतकं भारताला आध्यात्मिक सावली दिली आहे. परंतु या वृक्षावरच्या गहिनी नावाच्या परिपक्व फळाची दृष्टी दुसरीकडेच लागली होती. आपल्यातील बिजांना प्रेम भक्तीच्या वाळवंटात नव्यानं रोवण्याची ते वाट पाहत होते. याचं एक कारण म्हणजे पंथात सुरू झालेला वामाचार पण महाराष्ट्रातली धर्म, संस्कृती आणि आध्यात्मिक विश्व अजून शाबूत होतं. पंढरीला जाणारे वारकरी आपली विठ्ठल दैवताची उपासना पद्धती अर्थात वारी जिवंत ठेवत होते. दैवत, त्याची उपासना पद्धती आणि प्रमाण ग्रंथ या तीन महत्त्वाच्या गोष्टीतून कोणताही धर्म आणि संप्रदाय पूर्णत्वास येत असतो. वारकरी संप्रदायाला पूर्णत्व येण्यासाठी ग्रंथाची, तत्त्वज्ञानाची गरज होती. हे तत्त्वज्ञान देण्यासाठी नाथ संप्रदायसुद्धा आतुर होता. म्हणजेच काळाची गरज म्हणून आणि तितकाच निश्चयपूर्वक नाथ-वारकरी संगम झाला, असा निष्कर्ष काढता येऊ शकतो.

अर्थात नाथ संप्रदायातलं तत्त्वज्ञान घेऊन वारकरी



ज्ञानदेव चांगदेव भेटीचं मराठा शैलीतलं पोथीचित्र

संप्रदायात ग्रंथनिर्मिती करणं सोपं नव्हतं. एक वैष्णव तर दुसरा शैव. त्यात नाथ संप्रदायातलं अमूल्य तत्त्वज्ञान वेचून वारकरी संप्रदायाचा पाया रचणं महाकठीण. त्यामुळं एका दुव्याच्या शोधात दोन्ही होते. एक संप्रदाय शिष्याची तर दुसरा गुरूची वाट पाहत होता. नियतीनं टाकलेल्या फाशामुळं हा शोध संपला.

नामदेवांनी रचलेली आदी, तीर्थावळी आणि समाधी ही प्रकरणं याचा उलगडा करतात. आपेगावच्या विठ्ठलपंतांचे वडील गोविंदपंत आणि माता निराई यांना गहिनीनाथांचा उपदेश झाला होता, 'गोविंदा विश्रांती गहिनीनाथी' तसंच या उपदेशामुळं निराई मातेच्या गर्भात असणाऱ्या विठ्ठलपंतांवर प्रभाव पडला आणि त्याच भक्तीपोटी निराईमातेनं पुत्राचं नाव विठ्ठल ठेवलं. तसंच गोविंदपंतांचे वडील त्र्यंबकपंत यांना गोरक्षनाथांनी उपदेश केल्याचं सांगितलं जातं. घरात चालत आलेल्या नाथ परंपरेचं ज्ञान विठ्ठलपंतांनी मुलांना दिलं असणार, म्हणूनच संन्याशानंतर स्वीकारलेल्या संसारामुळं आलेल्या बहिष्कारातून बाहेर पडण्यासाठी आणि ज्ञान मिळवण्यासाठी ज्ञानदेवादी भावंडं स्वतःहून गहिनीनाथांच्या शोधात त्र्यंबकेश्वरी गेली असणार.

डॉ. सदानंद मोरे त्यांच्या 'चार भावंडे' पुस्तकात लिहितात, 'तथापि अद्याप त्यांना योग्य तो सांप्रदायिक गुरू भेटला नव्हता. तेव्हा अशा गुरूच्याच शोधात त्यांनी त्र्यंबकक्षेत्री जाण्याचा निर्णय घेतला असणार, आपल्या घराण्याचा आणि गहिनीनाथांचा निकटचा संबंध असल्याचं त्यांना ठाऊक होतं. त्यामुळं स्वतः गहिनीनाथांचीच भेट व्हावी असाही त्यांचा उद्देश असणार. त्र्यंबकेश्वरच्या ब्रह्मगिरीला प्रदक्षिणा घालताना व्याघ्रदर्शनानं पळापळ झाली आणि निवृत्तीनाथ योगायोगानं एका गुहेत शिरले. तिथं त्यांना गहिनीनाथ भेटले. अशा पद्धतीनं या प्रसंगाची मांडणी करण्यात येते. म्हणजे चौघांच्या चरित्रातील हा जणू एक अध्याय होता. वस्तुस्थिती तशी नसून गहिनीनाथांच्या ठावठिकाणाची चौकशी करूनच ते त्यांना शोधत शोधत येथपर्यंत आले असणार'.

व्याघ्रदर्शनानं पळापळ झाल्याचा उल्लेख नामदेवांच्या आदी प्रकरणात आढळत नाही आणि महत्त्वाचं म्हणजे त्र्यंबकक्षेत्र नाथ संप्रदायासाठी अत्यंत महत्त्वाचं ठिकाण असल्यानं, ही भावंडं स्वतःहून त्र्यंबकक्षेत्री गेल्याचं जास्त संभवतं. डॉ. रा. चिं. ढेरे म्हणतात, त्याप्रमाणं 'काश्मीर शैव परंपरेचं आदिपीठ त्र्यंबकमठीच होतं. तसंच ज्ञानदेव या त्र्यंबकमठाच्या परंपरेतच दीक्षित झालं होतं. त्यांचे ज्येष्ठ बंधू आणि सद्गुरू निवृत्तीनाथ हे प्रत्यक्ष त्र्यंबकमठातच गहिनीनाथांकडून अनुग्रहित झाले होते.' यावर इतर मतमतांतरं असू शकतात; परंतु नाथ परंपरा ज्ञानदेवांच्या घरात होती आणि नंतर निवृत्तीनाथांना गहिनीनाथांनी उपदेश केला ही सत्यपरिस्थिती आहे. ज्ञानोबांचा गुरूपरंपरेतला अभंग इथं सूचक ठरतो.

*आदिनाथ गुरू सकळ सिद्धांचा। मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य।।*
*मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला। गोरक्ष ओळला गहिनी प्रति।।*
*गहिनीप्रसादे निवृत्ती दातार। ज्ञानदेव सार चोजविलो॥*

असाच एक अभंग निवृत्तीनाथांचा आहे, आदिनाथ उमा बीज प्रगटले। मच्छिंद्रा लाधले सहजस्थिती।। यावरून असं म्हणता येईल की ही परंपरा आदिनाथ-मच्छिंद्र-गोरक्ष-गहिनी-निवृत्ती-ज्ञानदेव अशी आहे. याला लागून ज्ञानेश्वरीतल्या अठराव्या अध्यायातली ही ओवी पाहण्यासारखी आहे.

*ना आदिगुरु शंकरा। लागोनि शिष्यपरंपरा।*
*बोधाचा हा संसरा। जाला जो आमुतें।।*

आता इतर वारकरी संतांचा विचार करता गुरू गैबीनाथ। नरहरी दास हा अंकित।। असं म्हणत संत नरहरी सोनार आपल्याला गहिनीनाथांनी उपदेश केल्याचं सांगतात. तर दुसरीकडे संत विसोबा खेचर त्यांच्या शडूस्थळी किंवा षटस्थळ या ग्रंथात त्यांची गुरूपरंपरा आदिनाथ-मच्छिंद्र-गोरक्ष-मुक्ताई-चांगावटेश्वर-कृष्णनाथ-विसोबा अशी सांगतात. आता इथं असणाऱ्या मुक्ताई ज्ञानोबांच्या भगिनी नसून योगिनी आहेत. तसंच वरील चांगावटेश्वर आणि मुक्ताई अनुग्रहित चांगदेव एकच की दोन हा अभ्यासाचा विषय आहे. ते काहीही असले तरी विसोबांची गुरूपरंपरा नाथसंप्रदायाची होती हे म्हणता येतं. वरील ग्रंथ पूर्वीचा असून चार भावंडांची भेट नंतर घडली असावी. कारण यात कोणत्याच भावंडांचा उल्लेख नाही. विसोबांनी नंतर सोपानदेवांना गुरू केलं. संत नामदेवांनी याच विसोबांना गुरू केलं असलं तरी त्यांचा नाथसंप्रदायाशी थेट संबंध असल्याचं दिसत नाही.

संत एकनाथांचा विचार केला तर एका अभंगात ते म्हणतात, की पार्वतीला आदिनाथानं ज्ञान दिलं ते मच्छिंद्रनाथांना मिळालं आणि तोच बोध जनार्दन यांस होऊन आपल्यापर्यंत आला.

*एकांती नेऊन। उपदेशी राम अभिधान।।*
*तेंचि मच्छिंद्रा लाधले। पुढे परंपरा चालिले।।*
*तोची बोध जनार्दनी। एका लागतसे चरणी॥*

पण असं असलं तरी एकनाथांची गुरूपरंपरा वेगळी असून इथं नाथ परंपरेचा केवळ वैचारिक वारसा ते जपताना दिसतात. तुकोबांची गुरूपरंपरा तशी माऊली ज्ञानोबारायांपर्यंत जाऊन पोचते; परंतु तुकोबांचाही नाथ संप्रदायाशी थेट संबंध आल्याचं दिसत नाही.

वारकरी संप्रदायात नाथसंप्रदायाचा प्रवेश निवृत्तीनाथांपासून झाल्याचं दिसतं आणि जवळपास सर्व संतांना या चार भावंडांमुळं नाथसंप्रदायाचा परिचय झाला असावा. त्यामुळं नाथ-वारकरी संबंध पाहताना या चार भावंडांना विशेषकरून निवृत्तीनाथांना केलेला उपदेश कोणता, हे पाहिलं पाहिजे. हा उपदेश सुरू होतो आदिनाथ उमे पासून. सोप्या भाषेत सांगायचं तर शिवानं उमेला सांगितलेलं ज्ञान या परंपरेत आलं; पण ते ज्ञान कोणतं तर नामदेव रचित समाधी प्रकरणात, निवृत्तीनाथ म्हणतात,

*गहिनीनाथे मज सांगितले सार।*
*केली ज्ञानेश्वरे व्याख्या त्याची।।*

अर्थात आपल्याला झालेल्या उपदेशाची व्याख्या ज्ञानोबांनी केली. त्या अनुषंगानं मग माउलींच्या दोन रचना ज्ञानेश्वरी आणि अनुभवामृत यांचा विचार करावा लागतो. ज्ञानेश्वरी म्हणजे गीतेवरचं भाष्य, हे ज्ञान त्यांना नाथ परंपरेकडून प्राप्त झालं. गुरुपरंपरेच्या ओव्यांना लागून माऊली म्हणतात,

*मग आर्तांचेनि वोरासे। गितार्थ ग्रंथ मिसे।।*
*वरूषाला शांतरसे। तो हा ग्रंथु।।*

पण मग शैव असणाऱ्या गहिनीनाथांनी, कृष्णानं (विष्णू) सांगितलेल्या गीतेचा उपदेश कसा केला असा प्रश्न पडतो. त्याचं उत्तर असं देता येईल की शिवानं उमेस सांगितलेल्या ज्ञानात आणि भगवद्गीतेतल्या ज्ञानात एकवाक्यता आहे. हेच

**वार्षिक रिंगणच्या संत चांगदेव विशेषांकाला हार्दिक शुभेच्छा!**

**सुनील माने**

पुणे

ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायात दिसून येतं


*गितार्थाची थोरी। स्वये शंभू विवरी।।*
*तेथ हर म्हणे नेणिजे। देवी जैसे का स्वरूप तुझे॥*
*तैसे नित्य नूतन देखिजे। गितातत्व हे ॥*

अर्थात उमेला सांगितलेलं ज्ञान गीतेत असल्यानं गहिनीनाथांनी निवृत्तीनाथांना कृष्णनामाची दीक्षा दिली यात नवल नाही.

*निवृत्ती धर्मपाठ गयनी विनट।*
*कृष्णनामे पाठ नित्य वाचा ॥*
*तसंच*
*निवृत्ती गहिनी कृपा केली पूर्ण।*
*कुळ हे पावन कृष्णनामे ॥*

ज्ञानेश्वरीप्रमाणं माऊलींचा दुसरा ग्रंथ म्हणजे 'अमृतानुभव' त्यात देखील नाथ संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव दिसून येतो. या तत्त्वज्ञानाला चिद्विलास असं म्हणतात. हे विश्व मायेचा पसारा नसून एकच चैतन्यसत्तेचा विलास आहे. किंबहुना हे विश्व शिवशक्तीचं प्रगटीकरण आहे. त्यामुळं जग मिथ्या नसून शिवाइतकंच ते सत्य आहे, असं नाथ आणि वारकरी संप्रदायाचं म्हणणं आहे. अर्थात जग सतत बदलत असलं म्हणून त्याला मिथ्य न म्हणता माऊलींच्या लेखी ते नित्यनूतन तसंच परिवर्तनशील आहे. ते म्हणतात, 'जग असे की वस्तुप्रभा' अर्थात हे जग शिव तत्त्वाची प्रभा आहे ती शिवाहून निराळी नाही. एकूणच या तत्त्वज्ञानामुळं जग मिथ्य न वाटता त्याबद्दल आत्मीयता तसंच प्रेम वृद्धिंगत होत जातं.

माऊलींचे हे दोन्ही ग्रंथ निवृत्तीनाथांना मिळालेल्या ज्ञानाची व्याख्या करतात. कळीकाळातील भूतांना शांती प्रदान करणं हे या ज्ञानाचं प्रयोजन असल्याचं दिसून येतं. अभय टिळक त्यांच्या 'महाद्वार' पुस्तकात म्हणतात, 'ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव ही म्हणूनच त्याच शांतीची दोन रूपं. एक शांतिकथा तर दुसरा त्याच आत्यंतिक प्रशांतीचा प्रगाढ अनुभव.' अर्थात नाथसंप्रदायकडून मिळालेला ज्ञानाचा ठेवा हा शांतीसुखाचा आहे. याची पुष्टी निवृत्तीनाथांच्या गुरू परंपरेतल्या अभंगात होते




तया सर्वात्मका ईश्वरा ।
स्वकर्मकुसुमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा ।
तोषालागीं ।।
(ज्ञानेश्वरी, १८ - ९१३)

'रिंगण'ला शुभेच्छा !

मा. आशुतोष शेवाळकर

*तेची प्रेममुद्रा गोरक्षा दिधली।*
*पूर्ण कृपा केली गाहिनीनाथी॥*
*वैराग्य तापला सप्रेमे निवाला।*
*ठेवा जो लाधला शांतिसुख ॥*

गाहिनीनाथांना वैराग्य ताप भरला तेव्हा प्रेमानं ते शांत झाले असं म्हटलं आहे. इथं शांतीसुख महत्त्वाचं आहेच; परंतु ते शांतिसुख प्रेमानं प्राप्त झालं हे देखील ध्यानी घ्यायला हवं. शांतीसुखासाठी दिलेली ही प्रेममुद्राच वारकरी संप्रदायाचं सार आहे.

पुढं देखील योगसिद्धींनी तापलेल्या चांगदेवांना शांत करण्यात हेच प्रेम उपयुक्त ठरलं. इथं चांगदेवांचा उल्लेख करण्याचं कारण म्हणजे माऊलींनी चांगदेव पासष्टीच्या रूपात पत्र लिहिले त्यात नाथ तत्त्वज्ञान ओतप्रोत भरलेलं दिसतं. यातल्या ६५ ओव्या चांगदेवांसारख्या योग्याला जग रूपानं नटलेल्या त्या शिवतत्त्वाचं दर्शन घडवतात. चांगदेवांचा हा ताप महिपतीबाबांच्या शब्दात सांगायचा तर 'चौदा विद्या चौसष्ट कला॥ अवगत असल्या जरी सकळा॥ परी चित्ती नसली एक प्रेमकळा॥ तरी त्या विकळा अवघ्याची ॥' चौदाशे वर्ष जगलेल्या चांगदेवांचं जीवमात्रांवर अधिपत्य होतं; पण प्रेमाची कमतरता या तत्त्वज्ञानानं माऊलींनी भरून काढली. त्यांच्या रिद्धी-सिद्धी नामक जटांचा भार हलका करत माऊली त्यांना शांतीसुखाची प्रेम संजीवनी प्रदान केली.

एकूण काय तर नाथ संप्रदायाकडून आलेलं हे ज्ञान माऊलींनी आणि पुढं वारकरी संतांनी सर्वसामान्यांत रुजवलं, आत्मसुखाबरोबर हे प्रेम सार्वजनिक स्तरावरदेखील विकसित केलं, त्यास विश्वात्मक केलं. विचारांचा प्रभाव आचरणात झाला आणि त्याचा परिणाम समाजमनावर तसंच सामाजिक परिस्थितींवर झाला. वारकरी संतांनी आपल्या आचरणातून हे नाथ तत्त्वज्ञान व्यावहारिकदृष्ट्या सबळ केलं. त्याची शिकवण केवळ उपदेशापुरती मर्यादित राहिली नाही. ती अनेक सामाजिक विषयातून दिसली. हे ज्ञान वैश्विक आहे. यास भाषेचं बंधन असणं शक्यच नव्हतं. लोकांपर्यंत ज्ञान पोचवण्यासाठी माऊलींनी तसंच इतर संतांनी लोकांना मराठी भाषेत उपदेश केला. बुद्ध महावीरांनीदेखील पूर्वी असं केल्याचं आपल्याला ठाऊक आहे; परंतु गोरक्षनाथदेखील त्यास अपवाद नाही. त्यांचा महार्थमंजरी हा ग्रंथ महाराष्ट्री प्राकृतमधे असल्याचं बाळाचार्य खुपेरकर सांगतात. अर्थात भाषा आणि लिपींच्या विळख्यात ज्ञान बंदिस्त असलेल्या काळात नाथ-वारकरी संप्रदायानं ही ज्ञानाची तत्कालीन चौकट मोडीत काढल्याचं दिसतं.

भाषेप्रमाणं जाती-कूळ-वर्णदेखील ज्ञान अधिकारात बंधनं म्हणून येत; परंतु 'सकळांसी आहे येथ अधिकार' म्हणत वारकरी संप्रदायानं या सीमा नामशेष केल्या. स्त्रियांचा विचार करता नाथ संप्रदायात अनेक योगिनी होऊन गेल्या. वारकरी स्त्री संत त्याच परंपरेला उत्क्रांत करतात. संत मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई इत्यादी केवळ पदं रचण्यापुरत्या मर्यादित न राहता वेळप्रसंगी ताटीच्या अभंगातून उपदेशदेखील करतात. यातून हे दोन्हीं संप्रदाय परिवर्तनशील असल्याचं दिसून येतं आणि हे सर्व जगाबद्दल असलेल्या आत्मीयतेमुळंच साध्य झालं आहे.

ऐहिक जीवन निकोप होण्यासाठी वारकरी आणि नाथ संप्रदाय प्रयत्न करतात. जग शिवतत्त्वाचं विलसन असेल तर त्याची उपेक्षा करून चालणार नाही हे दोन्ही संप्रदायांना ठाऊक आहे. याच दृष्टिमुळं समाजाकडे पाहताना हे दोन्ही संप्रदाय त्यांची प्रेममुद्रा सोडत नाही. गहिनीनाथांच्या शांतीसुखापासून विश्वशांतीसाठी मागितलेल्या पसायदानापर्यंतचा विस्तार म्हणजे नाथ-वारकरी मिलन. मच्छिंद्र-गोरक्ष-गहिनीनाथांनी नाथ संप्रदायाचं तत्त्वज्ञान बीजरूपात जतन केलं. त्याचं रूपांतर करत वारकरी संतांनी सुवर्णपिंपळ साकारला. वारकरी भूमीत रोवल्या गेलेल्या या बीजाला प्रेमाच्या खतानं, भक्तीच्या पाण्यानं, नैतिकतेच्या आणि लोकसंग्रहाच्या आधारानं इथल्या संतांनी जिवंतपणा दिला. त्याच्या छायेत बसून महाराष्ट्रानं अमृतमय अनुभव घेतला. घेतोय.

*• लेखक हे नाशिकस्थित महाविद्यालयीन विद्यार्थी आहेत. संपर्क : ७५१७६०२२०९*



**वार्षिक रिंगणच्या संत चांगदेव विशेषांकाला हार्दिक शुभेच्छा।**

**पराग पाटील**

मुंबई